सैनिक कल्याण विभाग, पुणे व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील आणि सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने लिहिण्याकरिता प्राथमिक परिरक्षक यांची नियुक्ती तसेच मार्गदर्शक सूचनांबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.६५/२८
६ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सीएफआर-१२१७/प्र.क्र.१३१/तेरा, दिनांक १५/१२/२०१७.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ पासून गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सर्व राज्य शासकीय अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्यासाठी महापार (MahaPAR) ही ऑनलाईन प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे. याअनुषंगाने करावयाची कार्यपध्दती उपरोक्त संदर्भाधीन दिनांक १५/१२/२०१७ च्या शासन परिपत्रकात सविस्तरपणे विषद करण्यात आली आहे.

२. सैनिक कल्याण विभाग, पुणे व त्याअंतर्गत असलेल्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल या प्रणालीत नोंदविण्यासाठी संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांना **"प्राथमिक परिरक्षक"** म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

३. तसेच संदर्भाधीन परिपत्रकातील परिच्छेद -५ मध्ये नमूद केल्यानुसार सैनिक कल्याण विभागांतर्गत असलेल्या सर्व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांकरिता संबंधित जिल्ह्याचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना, तसेच छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक कार्यालयाकरिता प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांना **"अतिरिक्त परिरक्षक"** म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

४. सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद या कार्यालयातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल या प्रणालीत नोंदविण्यासाठी संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद यांना **"प्राथमिक परिरक्षक"** म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

५. तसेच मंत्रालयीन स्तरावर संबंधित सेवेचे नियंत्रण करण्यासाठी कार्यासन-२८ च्या श्रीमती सु.ग.गावडे, कक्ष अधिकारी, कार्यासन-२८ (E-mail - suvarna.gawde@nic.in, मोबाईल क्रमांक - ९३२११४५०२३) यांना माहिती व्यवस्थापक (EMD Manager) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. अतिरिक्त परिरक्षकांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांची सोबतच्या **परिशिष्ट-“ड”** मधील प्रपत्रात अद्ययावत माहिती (EMD- Employee Master Data) Excel Format मध्ये तयार करावी. EMD मध्ये नमूद करण्यात आलेला मोबाईल क्रमांक आधार क्रमांकाशी जोडलेला असावा, जेणेकरुन महापार प्रणालीमध्ये ई-साईन या सुविधेचा वापर करणे सुलभ होईल. ही सर्व माहिती अतिरिक्त परिरक्षक यांनी प्राथमिक परिरक्षक यांना पाठवावी. तसेच त्याची आगाऊ प्रत शासनास पाठवावी. अतिरिक्त परिरक्षक आवश्यकतेनुसार त्यांच्या नियंत्रणाखालील एक किंवा अधिक कर्मचाऱ्यांना पार व्यवस्थापक (Par Manager) म्हणून घोषित करु शकतील.

७. प्राथमिक परिरक्षक यांनी अतिरिक्त परिरक्षक यांचेकडून प्राप्त माहिती एकत्रित करुन ती माहिती व **परिशिष्ट-“इ”** मधील माहिती NIC यांना support-mahapar@nic.in या ई-मेल आयडीवर उपलब्ध करुन द्यावी. तसेच त्याची एक प्रत शासनास पाठवावी.

८. महापार प्रणालीमध्ये विविध स्तरावर कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या उपरोक्त संदर्भाधीन दि. १५/१२/२०१७ च्या शासन परिपत्रकातील **परिशिष्ट- “फ”** मध्ये दर्शविल्याप्रमाणे असतील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२३१४४४०७२९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Mahadeo Khade

Digitally signed by Suresh Mahadeo Khade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=14c299447f4a6e6c33ab3f7a85fbf010628981e82f8311a81d1cf974681485c2, serialNumber=f0b4c833a6fc7c6fb7cb0a96a3e2bb79d42d283b8f0f7bfc1ae95298d60bacf1, cn=Suresh Mahadeo Khade
Date: 2018.02.23 14:45:48 +05'30'

(सु.म.खाडे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्र.स.व वि.चौ.अ.(१), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे, "रायगड", राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर, घोरपडी, पुणे.
३. संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, एन-१२, सेक्टर-३, सिडको, औरंगाबाद
४. सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये.
५. प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक
६. निवडनस्ती.